## प्रकरण दुसरे

## प्रसार माध्यमे व अभ्यास सवयी


| | |
|---|---|
| २.० | प्रस्तावना |
| २.१ | प्रसारमाध्यमे |
| २.१.१ | दूरचित्रवाणी |
| २.१.२ | दूरचित्रवाणीमुळे शिक्षणात होणारे फायदे |
| २.२ | वृत्तपत्रे |
| २.३ | मासिके |
| २.३.१ | मासिकांची शैक्षणिक उपयुक्तता |
| २.४ | सवयी |
| २.४.१ | सवयी कशा लागतात |
| २.४.२ | सवयीचे महत्व |
| २.५ | अभ्यास सवयी |
| २.५.१ | वेळेचे नियोजन |
| २.५.२ | भौतिक परिस्थिती |
| २.५.३ | वाचन क्षमता |
| २.५.४ | नोंद घेणे |
| २.५.५ | शिकण्याच्या प्रेरणा व कारणीभूत परिस्थिती |
| २.५.६ | स्मरणशक्ति |
| २.५.७ | परीक्षा घेणे |
| २.५.८ | आरोग्य |
| २.९ | समारोप |

# प्रकरण – दुसरे

# प्रसार माध्यमे व अभ्यास सवयी

## २.० प्रस्तावना :

सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग म्हणून जास्त प्रचलित झालेले आहे. आज विदयार्थी केंद्रित शिक्षण पध्दतीला जास्त प्रमाणात वाव देण्यात आलेला आहे. शिक्षणात अध्ययनार्थींचे अध्ययन जास्त प्रभावी कशा पध्दतीने होईल तसेच अध्ययन जास्त प्रभावी कशा पध्दतीने होईल तसेच अध्ययन जास्त प्रभावी होण्यासाठी विविध साधनांचा वापर शिक्षणात कशा पध्दतीने करता येईल याकडे आजचे शिक्षण जास्त आकर्षित होत आहे. शिक्षणात अध्ययन पूरक साधने ब-याच प्रमाणात आहेत उदा. शैक्षणिक साधने, विविध शैक्षणिक प्रणाली, विविध अध्यापन पध्दती इ. अशा विविध साधनांपैकी प्रसार माध्यमे ही अध्ययनार्थींची अध्ययन क्षमता वाढविण्साठी जास्त परिणामकारक साधने आहेत.

वास्तविक प्रसार माध्यमांचा मूळ हेतू विविध माहिती लोकांपर्यंत पोहचविणे असा आहे. पण अध्ययनात माहिती संग्रहित करणे,आत्मसात करणे हा ही भाग असल्याने अध्ययनात विविध साधनाद्वारे माहिती मिळविणे हे महत्वाचे आहे म्हणून अध्ययनात प्रसार माध्यमे प्रभावीपणे काम करताना दिसून येतात. आपल्या सभोवताली घडणाऱ्या घटना आपल्याला प्रसार माध्यमामुळे समजतात. प्रसार माध्यमे ही समाज परिवर्तनाचे एक महत्वपूर्ण साधन आहे. आकाशवाणी, दूरचित्रवाणी, वृत्तपत्रे, मासिके या प्रसार माध्यमांची संप्रेषण क्षेत्रात व आपल्या दैनंदिन जीवनात महत्वाची भूमिका आहे.

पूर्वीची शिक्षण पध्दती ही शिक्षक केंद्रित शिक्षण पध्दती होती पण कालांतराने विद्यार्थी केंद्रित शिक्षण पध्दतीचा उदय झाला. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा शिक्षणाचा मुळ हेतू बनला. सर्वांगीण विकास होण्यासाठी विद्यार्थ्यांने आपल्या शैक्षणिक जीवनात जास्तीत जास्त माहिती विविध साधनांव्दारे गोळा करणे गरजेचे होऊ लागले.

केवळ शिक्षकांने व्याख्यान पध्दतीने आशय मांडणे आणि विद्यार्थ्यांने कान या ज्ञानेंद्रिया मार्फत आशय संग्रहित करणे हे कालबाह्य होऊ लागले. अध्ययन अध्यापनाच्या विविध पध्दतीचा अवलंब शिक्षणातून होऊ लागला. माहिती संग्राहेत करण्याकरिता विविध साधनांचा वापर शिक्षणातून होऊ लागला. या विविध साधना पैकीच एक प्रभावी साधन म्हणून प्रसार माध्यमांकडे पाहिले जाऊ लागले. ही प्रसार माध्यमे शिक्षण आणि दैनंदिन जीवनात महत्वाची भूमिका पार पाडतात.

## २.१ प्रसार माध्यमे :

एडलिन आणि पॉलसन (१९७२) यांच्या मते माध्यम म्हणजे 'Any person or material or event that establishes conditions which enable the learner to acquire skills and attitudes.

Media Means an agency or carrier of messages or the use of techonology to transmit intended messages to the receiver.'

विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सकारात्मक दृष्टीकोन व ज्ञानामध्ये वृध्दि करण्याचे काम प्रसार माध्यमे करीत असतात.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा ही शिक्षक, पालक आणि समाजाची अपेक्षा आहे. मूल्यमापन तंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या बौध्दिकतेबरोबर भावनिक आणि कारक विकासाचाही विचार होऊ लागला. हा विकास होण्यासाठी प्रसार माध्यमे महत्वाची भूमिका पार पाडतात.

### २.१.१ दूरचित्रवाणी (Television) :

दूरचित्र, नलिकाचित्र, दूरचित्रवाणी या विविध नावाने संबोधल्या जाणाऱ्या प्रसार माध्यमातील या आधुनिक साधनाने जगात संदेश वहनात क्रांती घडवून आणली. चित्र *आणि आवाज हे जरी लांब अंतरावर असले तरी, ते विजेच्या साह्याने दूर जागी एकत्र नेता* येतात आणि दूरचित्रवाणी संचात हे एकत्र करून दाखविले आणि ऐकविले जातात. चित्र

आणि ध्वनिसंकेतांचे त्यांच्या घटकात विभाजन, प्रत्येक घटकाच्या दृक व श्राव्य संकेतांचे विद्युत संकेतात रूपांतर व या विद्युत संकेताची परत क्रमवार मांडणी व मूळ चित्रप्रतिमा व ध्वनि यांची जुळणी अशी ही तांत्रिक प्रक्रिया आहे. ज्ञान व मनोरंजनाचे एक उत्कृष्ट साधन म्हणून आज याचा वापर होत आहे.

ध्वनी व दृश्य यांचा संगम म्हणजे चित्रवाणी. ध्वनी व दृश्य त्यांचे एकत्रीकरण झाल्यामुळे मुर्त, त्वरित व वास्तव अनुभव एकाच केंद्रावरून एकाच वेळी दूर अंतरावर असलेल्या अनेक व्यक्तींना निरनिराळ्या ठिकाणी पहाता. ऐकता येतो त्यामुळे ज्ञान, माहिती ग्रहण करण्यात एकरूपता येते. दूरचित्रवाणीवरील कार्यक्रम संयोजित करण्यासाठी दूरदर्शन ही संस्था १ एप्रिल १९७६ रोजी स्थापन करण्यात आली. भारतीय सरकार निर्मित दूरचित्रवाणी वाहिणीला दूरदर्शन असे संबोधण्यात आले.

दूरचित्रवाणी शैक्षणिक दृष्टिने अध्यापनाची सर्वसाधारण गुणवत्ता वाढविणे, वर्गातील कंटाळवाणे तेच ते वातावरण दूर करून त्यात नाविण्य व विविधता आणणे. विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन चिकित्सक करणे या गोष्टी दूरचित्रवाणी मूळे साध्य होतात. तरूण पिढीला सामाजिक व सांस्कृतिक वारशाचा परिचय दूरचित्रवाणी करून देते. या दृष्टिने हे संपर्क साधन सामाजिकरणाचे महत्वाचे साधन आहे. दूरदर्शन या दूरचित्रवाणीची स्थापना करण्याचा मुख्य हेतू करमणूक करणे, माहिती, ज्ञान लोकांपर्यंत पोहचवणे आणि औपचारिक शिक्षणाला हातभार लावून अनौपचारिक शिक्षणाचे कार्य करणे हे होते. याप्रमाणे शिक्षणात दूरदर्शन ही महत्वाची भूमिका पार पाडताना दिसून येते. अंतर्गत कांही कार्यक्रमाचे प्रसारण करून दूरदर्शन औपचारिक शिक्षणाला हातभार लावत आहे तसेच सांस्कृतिक कार्यक्रम, बौध्दिक मनोरंजनाचे कार्यक्रम अंतर्गत अनौपचारिक शिक्षणात दूरदर्शन महत्वाची जबाबदारी पार पाडत आहे. कमी वेळात व्यक्ती विकास, समाज विकास आणि देश विकासातील संदेश आणि मार्गदर्शन देणारी प्रभावी दूरचित्रवाणी कार्यरत आहे.

## २.१.२. दूरचित्रवाणीमुळे शिक्षणात होणारे फायदे :

१. शिक्षणात एकाग्रतेला महत्व आहे. दूरचित्रवाणीमुळे विषयात एकाग्रता वाढण्यास मदत होते. अभिरूचीमुळे व्यक्तीची अवधान क्षमता एकाच ठिकाणी राहते या मानसशास्त्रीय तत्वाप्रमाणे दूरचित्रवाणी हे अभिरूचीपूर्ण प्रभावी साधन असल्याने व्यक्तीचे अवधान जास्त काळ केंद्रित होते. त्याचा परिणाम बघणारी व्यक्ती माहिती चांगल्याप्रमाणे केंद्रित करू शकते.

२. शिक्षणात दृक-श्राव्य साधनाचे महत्व अनन्य साधारण आहे. दृक-श्राव्य साधनाच्या व्दारे दिली जाणारी माहिती दीर्घकाळ स्मरणात राहते याचा परिणाम दूरचित्रवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रमांतर्गत दिली जाणारी माहिती दीर्घकाळ स्मरणात राहते. ३. दूरचित्रवाणीकडे थोड्या वेळेच्या अवधीत जास्त माहिती देता येते.

४. समाजाच्या वागणूकीत व वृत्तीत बदल घडविण्यासाठी दूरचित्रवाणी फार परिणामकारक ठरते. समाज परिवर्तनासाठी दूरचित्रवाणी हे प्रभावी साधन होते आहे

५. तज्ज्ञ शिक्षकांच्या ज्ञानाचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना दूरचित्रवाणी माध्यमातून फायदा घेता येतो.

६. दूरचित्रवाणी माध्यमा व्दारे विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनातील गोडी वाढविता येते.

## २.२ वृत्तपत्रे :

वृत्तपत्रे/वर्तमान पत्र, हे सुसंस्कृत माणसाचे व लोक शिक्षणाचे महत्वाचे संपर्क साधन आहे. वर्तमानपत्र हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकणारे एक महत्वाचे साधन होय. वर्तमान पत्र हे महत्वाचे साहित्य आहे.

दूरचित्रवाणी व आकाशवाणी येण्यापूर्वी माहिती तत्कालीक पोहचवणारे महत्वाचे साधन म्हणून वृत्तपत्राकडे पाहिले जात होते. आज ही माहिती मिळवण्यासाठी आणि बातमी मिळवण्यासाठी वृत्तपत्रे हे कमी खर्चाचे व प्रभावी लोकप्रिय माध्यम आहे. जगातील सर्व

क्षेत्रातील घडामोडी विषयक माहिती मिळवण्याचे कमी खर्चीक प्रभावी साधन आहे.

जगातील किंवा देशातील बातमी देणारे पत्र म्हणजे वर्तमान पत्र होय. पूर्वी केवळ बातमी देणे व त्यातून समाज विकासाला गती देणे हे उद्देश डोळ्यासमोर ठेवून वर्तमान पत्रे कार्यरत होती पण आजच्या परिस्थितीत बातमी देणे, विविध समस्या वरील उपाय सुचविणे, मार्गदर्शन करणे. विद्यार्थ्यांना अध्ययनास प्रेरक साहित्य उपलब्ध करून देणे व वाचकांचे मनोरंजन करणे अशा विविध उद्देशाने आजची वर्तमान पत्रे कार्यरत आहेत.

वर्तमान पत्राचा वाचक वर्ग मोठा असल्याने विविध वयोगटासाठी वर्तमान पत्राची पाने असतात. आरोग्य पुरवणी, भविष्य वाणी, आर्थिक सल्ला, कौटुंबिक सल्ला, शैक्षणिक मार्गदर्शन, कविता, लेख, क्रिडाविषयक बातमी, लेख, राजकीय घडामोडी, थोर संतांविषयक माहिती व समाजातील सांस्कृतिक आर्थिक घडामोडी विषयक लेख अशा विविध तऱ्हेने वर्तमान पत्रे कामे करत असतात. लहान मुलांसाठी शाळेतील अभ्यासासंदर्भातील लेख, कला आवड, सवयी या संदर्भातील लेखापासून सुट्टीतील पान, विनोद अशा विविध प्रकारे लहान वर्गही वर्तमान पत्राने आकर्षित करून घेतलेला आहे.

आजची वर्तमान पत्रे उद्याचा इतिहास बनतात या वर्तमानपत्राशी विद्यार्थ्यांची जवळीक साधणे जास्त महत्वाचे आहे. वर्तमान पत्राची उपयुक्तता प्रचंड प्रमाणात आहे. शैक्षणिक उपयुक्ततेचा विचार करताना आपणास त्याची जी उपयुक्तता दिसून येईल, ती पुढीलप्रमाणे-

१. भाषेविषयी माहिती वृत्तपत्रातून मिळले. वाचन कौशल्य वर्तमान पत्रातून विकसित होते.

२. विविध लेखकांचा परिचय विविध ग्रंथांचा परिचय विद्यार्थ्यांना वर्तमान पत्रातून होतो.

३. विविध कवींची कविता मुलांना वर्तमान पत्रातून वाचवयास मिळते. सौदर्यकला जोपासली जाते.

४. अभ्यास क्रमाविषयी विविध शिक्षकांची, तज्ज्ञांचे अभ्यास लेख विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातून वाचण्यास मिळते.

५. विविध विषयाप्रमाणे अभ्यास मात्र विद्यार्थ्यांना वाचाण्यास मिळते, स्वयंअध्ययनास प्रेरणा जागृत होते.

६. विविध कोडी, शब्द कोडी, यातून विद्यार्थ्यांच्या विचार शक्तीला चालना मिळते.

७. प्रथम क्रमांकाच्या विद्यार्थ्यांविषयी कौतुकाचे लेख, फोटो या वाचनाने इतर विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयक प्रेरणा दृढ होत जाते.

## २.३ मासिके :

छापिल साहित्यामधील मासिके हे प्रभावी साधन आहे. वर्तमान पत्रे ही जास्त करून बातमी देणे व विविध विषयांवर प्रकाश टाकत असली तरी त्याला एक मर्यादा आहे. वेळेची मर्यादा. पानातील जागेची मर्यादा. आर्थिक मर्यादा यामुळे वर्तमान पत्रे प्रभावी छापिल साहित्य असून ही सर्वक्षेत्रावर, विस्ताराने माहिती प्रकाशित करू शकत नाही म्हणून विस्ताराने, जास्तीत जास्त माहिती प्रकाशित करण्यासाठी साप्ताहिक आणि मासिके या साधनांचा उपयोग होतो.

एकूण सर्व विषयांतील माहितीचे वर्गीकरण करावयाचे झाल्यास विविध साप्ताहिक मासिकांचा विचार करावा लागेल. उदा. आरोग्याविषयक जास्त माहिती मिळवण्यासाठी आरोग्य विषयक मासिके (शतायुषी) आर्थिक माहिती मिळवण्यासाठी (अर्थमंथन) शिक्षक शिक्षण विषयक (शिक्षण संक्रमण) तत्कालीक विविध विषयाची माहिती देणारे विविध मासिके आहेत. उदा. लोकप्रभा, चित्रलेखा, लोकसत्ता इ.

साप्ताहिक किंवा मासिके यांचा उद्देश ही समाजातील विविधस्तरात, जास्तीत जास्त माहिती पोहचवणे असा आहे. कौटुंबिक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, प्रश्न सोडविण्यासाठी विविध लेखांच्या साह्याने माहिती प्रकाशित केली जाते की ज्याचा परिणाम वाचक वर्गांना या प्रश्नाविषयी जनजागृती होणे आवश्यक असते.

## २.३.१ मासिकांची शैक्षणिक उपयुक्तता :

१. अभ्यास कसा करावा. प्रश्न पत्रिका कशा सोडवाव्यात याविषयी मार्गदर्शनपर लेख मासिकात प्रकाशित होत असल्याने याविषयी माहिती विद्यार्थ्यांना प्राप्त होते व त्या दृष्टीने वर्तनात बदल होतो.

२. चांगल्या सवयी जोपासण्यासाठी मासिकाची उपयुक्तता जाणवते.

३. व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी मासिके प्रयत्नशील असतात.

४. विविध शैक्षणिक प्रश्नाविषयी माहिती मासिकातून उपलब्ध होते.

५. शैक्षणिक विविध शाखांविषयी माहिती विद्यार्थ्यांना मासिकातून प्राप्त होते.

६. व्यावसायिक मार्गदर्शन करण्यासाठी मासिके महत्वाची जबाबदारी पार पाडतात.

## २.४ सवयी (Habits) :

मानव व इतर प्राण्यांच्या वर्तनात प्रमुख फरक असा आहे की मनुष्याच्या बाह्य जगाशी जस जसा संबंध येतो, तस तसे त्याच्या सहजप्रवृत्त वर्तनावर नियंत्रणे घालून नवीन प्रकारचे वर्तन प्रकार संपादित करतो. या संपादित वर्तन प्रकारामध्ये सवयी, कौशल्ये, स्थिरभाव, गंड, अभिवृत्ती इ. समावेश होतो,

सवय (Habits) सवय म्हणजे असे वर्तन दिसते जे वर्तन करताना विचार करावा लागत नाही अशा वर्तनाचा सवयीमध्ये समावेश होतो. अगदी यांत्रिकपणे वारंवार घडणाऱ्या वर्तनाला सवय असे म्हणतात.

'Habits' is the name given to behaviour so often repeated as to be automatic - Gurret.

'By strict definition those acts are habitual which are performed with little or no thought and allways in approximately the same way.'

'व्यक्तीचे अजाणतेपणी, अत्यंत वेगाने व वारंवार घडणारे निर्हेतूक वर्तन म्हणजे

सवय.'

### २.४.१ सवयी कशा लागतात :

एखादे वर्तन केले असता व्यक्तीला ज्यावेळी समाधान मिळते अशा वर्तनाचे आवर्तन करण्याची प्रवृत्ती व्यक्तीमध्ये असते. उदा. कांही लोकांना सकाळी उठल्यावर चहा लागतो येथे सुरूवातीला उत्साह यावा म्हणून चहा घेतला जातो परंतु नंतर हेच वर्तन पुन्हा पुन्हा होऊ लागले त्यानंतर उत्साहापोटी घेतलेला चहा पुढे सवयीत रूपांतर होते आणि ही सवय लागल्यानंतर पुढे चहा मिळाला नाही तरी व्यक्ती बेचैन होते.

### २.४.२ सवयीचे महत्व :

आपल्या वर्तनाचा बराचसा भाग सवयी मुळे व्यापलेला असतो व्यक्तीच्या जीवनात सवयींचा वाटा खूप मोठा आहे.

१. सवयी मुळे आपल्याला प्रत्येक प्रकारच्या वर्तनात मानसिक कष्ट घ्यावे लागत नाही. उदा. जेवताना पेपर वाचणे.

२. आपले वर्तन सवयीने घडत असल्याने प्रत्येक वेळी आपल्याला संभाव्य चिंतेची गरज नसते.

३. आपल्याला जी दैनंदिन कामे करावी लागतात ही सर्वच आपल्या आवडीची असत नाहीत. उदा. बुटाला पॉलिश करणे, दाढी करणे, पण ही कामे सवयीने करता येतात.

४. सवयीमुळे कर्तव्यदक्षता विकसित होण्यास मदत होते. उदा. दररोज अभ्यास करण्याची सवय असलेला विद्यार्थी परीक्षेत चांगले गुण मिळवू शकतो.

## २.५ अभ्यास सवयी (Study Habits)

विद्यार्थ्यांच्या अध्ययनात शैक्षणिक गुणवत्ता असते पण अध्ययन करण्यासाठी आवश्यक अभ्यासाच्या सवयी असणे गरजेचे आहे. वेळेवर अभ्यास करणे. वर्गात टिपणे घेणे, रोज गृहपाठ करणे, वाचनानंतर आपण काय वाचलो याचा विचार करणे, पाठांतर

करणे, अशा कांही अभ्यासाच्या सवयी आहेत. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात या सवयींचा वापर केल्यास अभ्यासाला योग्य दिशा प्राप्त होते. अभ्यासाच्या चूकीच्या पध्दती ह्या शैक्षणिक मागासलेपणाचे एक प्रमुख कारण आहे.

विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीमध्ये मुख्यत: वाचनाची सवय, शिकण्याचे तंत्र, स्मरण शक्ती, वेळापत्रक, परीक्षा, मूल्यमापन इत्यादींचा समावेश होतो.

शिक्षकांना, विद्यार्थ्यांना आणि पालकांना अभ्यासाच्या चांगल्या सवयीची माहिती करून देण्यासाठी आणि चांगले यश संपादन करण्यासाठी ही यादी एक उत्तम म्हणून पहाता येईल.

## २.५.१ वेळेचे नियोजन :

अभ्यास करताना दैनंदिन जीवनात अभ्यासासाठी वेळे देणे आवश्यक आहे. म्हणून अभ्यासासाठी वेळेचे नियोजन करणे महत्वाचे आहे. वेळेचे नियोजन करताना आठवड्याचे एकूण दिवस अभ्यासक्रमाची व्याप्ती. अभ्यासक्रमातील आवश्यक घटक याचा विचार करून अभ्यासासाठी दिवसातील किती वेळ देता येईल. याचे नियोजन करणे. दैनंदिन व्यवहारातील गरजा भागविण्यासाठी असणारा वेळ (उदा. भूक, झोप, विश्रांती, तहान) आणि अभ्यासासाठी आवश्यक वेळ याचे योग्य नियोजन चांगल्या अभ्यास सवयीत होणे आवश्यक आहे.

## २.५.२ भौतिक परिस्थिती :

हा एक अभ्यास सवयीमधील महत्वाचा भाग आहे. अभ्यासास पूरक परिस्थिती असणे आवश्यक आहे. या पूरक परिस्थितीत अभ्यासाचे ठिकाण, हे शांत, स्वच्छ, प्रकाशित व योग्य वायुविजन असलेले हवे, फर्निचर हे अभ्यासास उपयुक्त हवे. अभ्यासासाठी शैक्षणिक साधने पुरेशी हवीत, भौतिक परिस्थितीचा परिणाम अभ्यास करताना जाणवतो म्हणून योग्य भौतिक सोयी ह्या अध्ययनास उपयुक्त ठरतात.

### २.५.३ वाचन क्षमता :

अभ्यास सवयीमधील महत्वाचा एक घटक म्हणून आपण वाचन क्षमतेकडे पहातो. वाचन करून विद्यार्थी आशय घटकाची माहिती मेंदूपर्यंत पोहचवण्याचे कार्य करतात. वाचन क्षमता उत्तम असेल तर ज्ञानेंद्रियामार्फत जास्तीत जास्त आशय घटकाची माहिती मेंदूपर्यंत पोहचवली जाईल व ती दिर्घस्मृतीत राहिल त्याचा उपयोग विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतेवर होतो. वाचन क्षमतेत. वाचलेला आशय अर्थपूर्ण असणे आवश्यक आहे. शब्द संग्रह, भाषा शैली, वाचनातील सारांश, भाषेचे ज्ञान या उपघटकाचा समावेश वाचन क्षमतेत होतो.

### २.५.४ नोंद घेणे :

विविध ज्ञानेंद्रियामार्फत व्यक्ती माहिती गोळा करत असतो. आवश्यक माहिती स्मरणात ठेवली जाते तसेच अभ्यास करतानाही ज्ञानेंद्रियामार्फत विद्यार्थी व्यक्ती माहिती मिळवत असतात व आवश्यक माहिती स्मरणात राहण्यासाठी त्याच्या नोंदी ठेवल्या जातात व या नोंदी सराव पध्दतीने स्मरणात ठेवण्याचा प्रयत्न असतो. या नोंदीमध्ये अभ्यासक्रमातील आवश्यक पण सारांश भाग असतो. जास्तीत जास्त माहितीची नोंद ठेवल्याने, या नोंदी वरून अंतिम नोट तयार करता येते.

### २.५.५ शिकण्याच्या प्रेरणेमधील कारणींभूत परिस्थिती :

शिकण्याची योग्यता नसून देखील शिकण्याची तीव्र इच्छा असणे हे अभ्यासाचे परिशीलन आहे. जर एखाद्याला शिकण्यामध्ये आवड असेल तर तो लगेच शिकतो आणि चिरकाळ स्मरणात ठेवतो. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या क्षमतेमध्ये फरक असतो. प्रत्येकाला त्यामध्ये जादा प्रयत्न करून सुधारणा करता येते. शिकण्यासाठी स्पर्धा करण्याची तयारी आणि सहकार्य करतात. प्रत्येक जण गटामध्ये चांगले अध्ययन करू शकतो.

### २.५.६ स्मरणशक्ती :

स्मरणशक्ती वाढल्याने अध्ययन उत्कृष्ठ होते. अध्ययन वेळेची विभागणी करून

एकत्रित शिकणे अधिक चांगले ठरते. आपण जितके चांगले अध्ययन करू तितके आपल्या स्मरणात राहिल. सातत्याने सराव केल्याने स्मरण शक्तीत वाढ होते. चांगल्या स्मरण शक्तीमुळे अध्ययन योग्य होते.

### २.५.७ परीक्षा घेणे :

शिक्षणात जास्तीत जास्त परीक्षा ह्या निबंधवजा प्रकारच्या आहेत. यामध्ये मोठी उत्तरे असतात ऐन वेळी परीक्षेत एवढी मोठी उत्तरे लिहिणे शक्य होत नाही म्हणून अभ्यास सवयीत परीक्षेची पूर्व तयारी म्हणून एक आभासात्मक परीक्षेचा वापर होतो. परीक्षेच्या वेळा एवढाच वेळ ठेवून निबंधवजा प्रश्नाच्या उत्तराचा सराव करून घेतला जातो त्यामुळे अभ्यासक्रमातील आशय व्यवस्थितरीतीने मांडण्याची क्षमता विकसित होते.

परीक्षा देताना विषयाची मांडणी, उत्तराची व्याप्ती, भाषा शैली, तात्विक बाजू याकडे जसे लक्ष दिले जाते तसेच परीक्षेसाठी आवश्यक असणारा वेळ याकडे ही लक्ष देणे आवश्यक आहे. ठराविक कालावधीत (वेळात) उत्तरपत्रिकेचे सादरीकरण महत्वाचे ठरते.

### २.५.८ आरोग्य :

अध्ययनार्थींचे उत्तम आरोग्य हे चांगल्या व्यक्तिमत्वाचे लक्षण असते. उत्तम आरोग्यामध्ये शारिरीक आरोग्य आणि मानसिक आरोग्य या दोन्ही बाजू महत्वाच्या आहेत. चांगले मानसिक आणि शारीरिक आरोग्य असेल तरच चांगले अध्ययन होऊ शकते म्हणून अभ्यास सवयीमध्ये आरोग्यासाठी आणि अभ्यासासाठी दिलेला वेळ महत्वाचा आहे. एकच एक काम सातत्याने करत गेल्यास मनावरचा ताण वाढत जातो आणि मानसिक थकवा येऊन चूकांचे प्रमाण वाढते व अशा वेळी विश्रांतीची आवश्यकता भासते हे मानसशास्त्रीय तत्व आहे म्हणून विद्यार्थ्यांचे अध्ययन उत्कृष्ठ होण्यासाठी चांगल्या आरोग्याची जोपासणा होणे आवश्यक आहे.

## २.९ समारोप :

सदर प्रकरणात संशोधन समस्येशी निगडीत प्रत्येक संकल्पनेची माहिती घेतलेली आहे. पुढील प्रकरणात संशोधन समस्येशी संबंधीत साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे.